## नोंदणी  झालेल्या दस्तास जादा भरलेल्या नोंदणी फी चा परतावा

## Refund of excess Registration fee

### विषय ओळख (About)

नोदंणीकृत दस्तामध्ये, अनवधनाने जास्तीची नोदंणी फी आकारण्यात आलेली असल्याचे संबधित दुय्यम निबंधक कार्यालयास अर्जाद्वारे निदर्शनास आणणे आवश्यक आहे. खरोखरीच आकारणीयोग्य नोदंणी फी पेक्षा जास्तीची नोदंणी फी आकारण्यात आलेली असल्याबाबत दुय्यम निबंधक यांची खातरजमा झाल्यास ते पुढील मंजुरीसाठी त्यांचा प्रस्ताव, सह जिल्हा निबंधक कार्यालयात  व त्यांचे कार्यालय आवश्यक त्या शिफारशीसह तसा प्रस्ताव नोंदणी महानिरीक्षक,पुणे कार्यालयास पाठवितात.

अशा जादा भरलेल्या नोंदणी फी चा परतावा मंजुर करण्याचे अधिकार नोंदणी महानिरीक्षक,पुणे यांना कलम 80 अ खाली प्रदान करण्यात आले आहेत. यासंबधात अधिक माहीतीकरीता, सारथी < दस्त नोंदणी< इतर काही महत्वाच्या बाबी <नोदंणी फी परतावा पहावे.